विशेष दिवाणी दावा क्र. ०९/२०१७
गंगाधर वि. संभाजी व इतर

**आदेश नि.क्र. १६६ वर**

(CNR No. MHLA050010022017)

प्रतिवादींनी या अर्जाद्वारे कागदपत्र दाखल करुन घेण्याची व त्यास निशाणी देण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर वादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींच्या वकिलांचे म्हणणे असे की, कैफियत दाखल करतेवेळी हे कागदपत्र उपलब्ध झालेले नव्हते. प्रतिवादी दाखल करीत असलेले कागदपत्र वादीच्या माहितीचे आहेत. त्यामुळे ते दाखल करुन त्यास निशाणी देण्यात यावी. वादीच्या वकिलाचा युक्तीवाद असा की, वादीचा पुरावा चालु असताना प्रतिवादींनी ते कागदपत्र इतक्या विलंबाने दाखल केलेले आहेत. त्यामुळे हे कागदपत्र दाखल करुन घेऊ नयेत. या कागदपत्रांचा या दाव्याशी कांहीही संबंध नाही. प्रतिवादींना हे कागद सिध्द करावे लागणार आहेत व त्यानंतरच कागदपत्रास निशाणी देता येईल.

४. सदरचा दावा हा स्थावर मिळकती संदर्भात दाखल केला आहे. प्रतिवादींनी या अर्जासोबत दाव्यातील जमीनीसंदर्भात सातबारा उतारे, फेरफार उतारे व इतर कागदपत्रे दाखल केलेले आहेत. सदरची कागदपत्रे दाव्याशी निगडीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कागदपत्र दाखल करुन घेतल्यास वादीचे कांही नुकसान होणार नाही. परंतु या कागदपत्रामध्ये ज्या सत्यप्रती नाहीत ते कागदपत्र प्रतिवादींना सिध्द करावे लागणार आहे. त्यामुळे या कागदपत्रांना निशाणी देण्याचा प्रश्न प्रतिवादींच्या पुराव्यावेळी ठरवता येईल. या

घडीला कागदपत्र दाखल करण्यास प्रतिवादींना संधी देणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

कागदपत्र दाखल करण्यास मंजुरी दिली आहे.

**(प्र. अ. सवदीकर)**

दि.०१/१२/२०२१.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.